सकाळ

# सायबर वॉरियर्स म्हणून २० स्वयंसेवकांना प्रशिक्षण




**अहिल्यानगर, ता. ११ :** ''सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा'' या उपक्रमाअंतर्गत अहमदनगर महाविद्यालयात संगणक विभागाच्या सहकार्याने अहमदनगर सायबर वॉरियर्सच्या २० स्वयंसेवकांना प्रशिक्षण देण्यात आले.

स्वयंसेवकांना सायबर जनजागृती, व्यावसायिक कौशल्ये, व्यक्तिमत्त्व विकास, नेतृत्व क्षमता आणि त्यांच्या अंगी असलेल्या गुणांची ओळख करून देत भविष्यातील जबाबदाऱ्यांसाठी सक्षम बनविणे हा मुख्य उद्देश होता.

या प्रशिक्षणासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अभिजित कुलकर्णी, उपप्राचार्य डॉ. दिलीप भालसिंग, उपप्राचार्य विलास नाबडे, संगणक विभागप्रमुख रझ्झाक तसेच रोजगार समन्वयक निवेदिता काळे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षित २० स्वयंसेवकांना सायबर जनजागृती उपक्रमांमध्ये सक्रिय करण्यात आले. यावेळी क्विक हील फाउंडेशनतर्फे दीपू सिंह यांनी मार्गदर्शन केले.

संवादात्मक उपक्रम, गटचर्चा आणि प्रत्यक्ष उदाहरणांच्या माध्यमातून त्यांनी स्वयंसेवकांना स्वतःच्या क्षमतांची जाणीव करून देत त्यांचा प्रभावी विकास करण्यासाठी प्रेरित केले.

संकल्पना, प्रभावी संवाद कौशल्य, सांघिक कार्यपद्धती, नेतृत्वगुण आणि सामाजिक जबाबदारी यांसारख्या महत्त्वपूर्ण बाबी आत्मसात केल्या.